**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

दिनांक 07/02/2024 (बुधवार) सायंकाळ

---

## अवैध्यरीत्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीस अटक

दिनांक २२/०१/२०२४ रोजी सकाळी ०८.०० वा. दरम्यान पो. स्टे. भिवापूर येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग व वाहतूक केसेस करीत असताना नीलज फाट्याकडून भिवापूरकडे १० चक्का टिप्पर ट्रक क्र. MH-36/AA-2182 व टिप्पर ट्रक क्र. MH-40/BL-1649 हे येताना दिसले त्यांचा पाठलाग करून भिवापूर बस स्टॅन्ड समोर भिवापूर येथे थांबवून पाहणी केली असता त्यामध्ये दोन्ही ट्रक मध्ये अंदाजे ०६ ब्रास रेती मिळून आल्याने दोन्ही ट्रक चालकास सदर ट्रक मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता त्याने रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने टिप्पर क्र. MH-36/AA-2182 किंमती २५,००,०००/—रू. व त्यामध्ये ०६ ब्रास रेती किंमती ३०,०००/—रू. व टिप्पर क्र. MH-40/BL-1649 किंमती २५,००,०००/—रू. व त्यामध्ये रेती ०६ ब्रास किंमती ३०,०००/—रू. असा दोन्ही मिळून एकूण ५०,६०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करून सदर आरोपीविरूद्ध पोस्टे भिवापूर येथे अप क्र. १९/२४ कलम ३७९, १०९ भा.द.वी. सहकलम ४८(७), ४८(८) महा. ज. म. स. सहकलम ४, २१ खाणी आणि खनिजे अधी. १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो.स्टे. भिवापूर येथे गुन्हा नोंद करणेत आलेला होता. सदर टिप्पर क्र. MH-36/AA-2182 चा **मालक दिनेश सावरबांधे, रा. आसगाव** यास अटक करण्यात आली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**